■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २६८ ■ सोमवार दि.१६ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 268 ■ Monday Dt.16 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# अहो मुख्यमंत्री साहेब, बीड जिल्ह्याची कायदा सुव्यवस्था अबाधित होत नसेल तर तुम्ही राजीनामा द्यायला हवा?

## 'तुझा संतोष देशमुख करतो' गाडी अडवत कोयत्यानं सपासप वार; डोकं अन् मानेतून रक्ताच्या धारा?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## बीड जिल्ह्याची परिस्थिती बदलेल या आशेने अजित दादाला पालकमंत्री केले मात्र गुन्हेगारीचे प्रमाण जास्त वाढले?

# बीड जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्या; कायदा सुव्यवस्था जिल्ह्यात समाधानकारक नाही, जिल्ह्याचं नेतृत्व काय कामाचे?

## गृहमंत्री या नात्याने नैतिकतेच्या अधारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा!

## बीड जिल्ह्यात गुन्हेगारांना धाक राहिला नाही एसपी साहेब नावाला काम करता का?

## बीड जिल्ह्याचा एस.पी. बदलून गुन्हेगारीला आळा बसेल असे वाटत असताना दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत आहे

बीड । प्रतिनिधी

शेतीमधील बांधाच्या वादावरून बीडमध्ये मारहाणीचा प्रकार घडला आहे. 'तुझा संतोष देशमुख करतो', अशी धमकी देत भररस्त्यात आरोपीने तरूणावर कोयत्याने सपासप वार केले. शरीरावर १०० हून अधिक गंभीर वार असल्याची माहिती आहे. तरूणाची स्थिती गंभीर असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे इतक्या गंभीर हल्ल्यानंतरही बीड ग्रामिण रूग्णालयात अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही.

कैलास सांगुळे असं जखमी तरूणाचं नाव आहे. तो बीड तालुक्यातील तांदळवाडी भिल्ल येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. कैलास गाडी चालवत होता. यादरम्यान, चार जणांनी त्याची वाट अडवली. तसेच कोयत्याने डोक्यावर, मानेवर आणि तोंडावर जबरदस्त हल्ला केला. हल्लेखोरांनी 'तुझा संतोष देशमुख करतो, याला जीवे मारा' अशी धमकी देत त्याला मारहाण केली. हल्ला झाल्यानंतर तरूण बेशुद्ध अवस्थेत पडला.

यानंतर त्याच्या भावाने घटनास्थळी धाव घेत भावाला बीडमधील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं. कैलासवर सध्या रूग्णालयात उपचार सुरू असून, त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. यानंतर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. यानंतर कुटुंबाने पोलिसांवर गंभीर आरोप करीत आक्रोश व्यक्त केला आहे. माझ्या भावाचं काही बरं वाईट झालं तर याला जबाबदार पोलीस प्रशासन असेल, असं म्हणत कुटुंबाने प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. आरोपी मोकाट असून, पोलिसांनी अद्याप गुन्हा दाखल केला नसल्यामुळे त्यांची भूमिका संशयास्पद ठरत आहे.







## वाळूची चोरटी वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला

बीड । प्रतिनिधी

दिनांक १५/०६/२०२५ रोजी चकलंबा पोलीस स्टेशनचे सपोनि संदिप पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजे धारवांटा शिवारात सिंधफणा नदीत एक ट्रॅक्टर अवैध रित्या वाळू उपसा करून ट्रॅक्टर मध्ये भरत आहे. या वरून पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता ट्रॅक्टर मध्ये वाळू भरणारे यांच्या लक्षात येताच त्यांनी वाळू नदी मध्ये टाकुन ट्रॅक्टर पळवून घेऊन गेले. त्यावेळी पोलीस पथकाने त्यांचा पाठलाग करून गावात ट्रॅक्टर चा शोध घेतला असता ट्रॅक्टर क्रमांक MH २३ BH २०३१



ताब्यात घेतले. ट्रॅक्टर चालक व मालक यांचेविरुद्ध चकलंबा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ७,००,००० रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप, पाटील पोउपनि पानपाटील, पोलीस अंमलदार मिसाळ, पोलीस अंमलदार खटाने पोलीस अंमलदार घोगडेंयांनी केली आहे.

## परळीत पंचायत समिती समोर अपघात; मोठा अनर्थ टळला

परळी वैजनाथ । प्रतिनिधी



परळी शहरातील मलिकपुरा भागात जनता ट्रेडर्स पंचायत समिती समोर आज दुपारी १२:३० वाजेचा सुमारास भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पंचायत समिती समोर वळन घेताना मोटरसायकल येत होती आणि दुसऱ्या बाजूने हायवा (MH४४U१८९४) येय होता, हायवाच्या चालकाचा सतर्क मुळे मोठा अनर्थ टळला आहे, मलिकपूरयातील स्थानिक नागरिकांच्या म्हनं आहे की पंचायत समिती समोर गतीरोधक बंधनकारक आहे, दोन्ही बाजूने गतीरोधक टाकायची गरच आहे. याच जागी अगोदर ही छोटे मोठे अपघात झाले आहे.

## गेवराईत लाचलुचपत विभागाची धडक कारवाई; लाच घेतल्याप्रकरणी एकाला अटक

### गेवराई पंचायती समितीत सन्नाटा; आणखी काही कर्मचारी लुचपत प्रतिबंधक विभागाच्या रडारवर?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई पंचायत समिती कार्यालयातील, स्वच्छ भारत अभियान विभागात कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने,सोमवार ता. १६ रोजी दुपारी कारवाई केली आहे. या कारवाईने पंचायत समिती परिसरात खळबळ उडाली आहे. घटना घडताच, पंचायत समिती कार्यालयात शुकशुकाट दिसून आला. अनेक अधिकारी कर्मचाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयातून निघून गेले. दरम्यान, गेवराई पंचायत समितीच्या भ्रष्ट कारभाराने कळस गाठला असून, आणखी काही अधिकारी, कर्मचाऱ्यारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या रडावर असल्याची चर्चा आहे.

गेवराई पंचायत समिती कार्यालयातील स्वच्छता अभियान विभागात एका व्यक्तीचे काम करण्यास टाळाटाळ केली जात होती. संबंधित कर्मचारी यांनी विलास चव्हाण यांनी तक्रारदाराकडे पैशाची मागणी केली. त्या संदर्भाने सोमवार ता. १६ रोजी दु. २ वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पंचायत समिती कार्यालयात सापळा रचून कारवाई केली आहे. घटना घडताच, पंचायत समिती परिसरात एकच गोंधळ उडाला. काय झाले, हेच लवकर कळाले नाही. कार्यालयीन कामाचा पहिलाच दिवस असल्याने पंचायत समिती परिसरात गर्दी होती.

▶ पान २ वर




### भ्रष्टाचार निर्मूलन समिती राष्ट्रीय अध्यक्ष इंजिनीयर सादिक इनामदार यांची भ्रष्टाचार निर्मूलन समिती धर्मदाय आयुक्त कार्यालयामार्फत अधिकृत नोंदणी असताना सत्यमेव जयते प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत उदगुडे पाटील यांनी बेकायदेशीर भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे नाव वापरून केला भ्रष्टाचार


## माझी बदनामी केल्याने कारवाई करण्यात यावी म्हणून न्यायालयात दाद मागणार : इनामदार

बीड । प्रतिनिधी

पुणे धर्मदाय आयुक्त कार्यालय मार्फत सत्यमेव जयते प्रतिष्ठान धर्मदाय आयुक्त कार्यालय पुणे



यांच्या कडे नोंद असताना भ्रष्टाचार निर्मूलनचे नाव बेकायदेशीर वापरून पदाधिकारी व सदस्यांची मागील तेरा वर्षापासून दिशाभूल व फसवणूक करणारे श्री तात्यासाहेब उर्फ चंद्रकांत उदगुडे पाटील यांनी महाराष्ट्रातील अनेक सदस्य पदाधिकारी यांना भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे चे नियुक्तीपत्र देऊन मी इंजिनीयर सादिक इनामदार मराठवाडा अध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन समिती या पदावर चंद्रकांत उदगुडे पाटील यांनी नियुक्तीपत्र देऊन नियुक्ती केल्यामुळे सात वर्षे काम केले त्यानंतर तत्कालीन आरोग्य आयुक्त श्री तुकारामजी मुंडे साहेब व तत्कालीन जिल्हाधिकारी श्रीमती दीपा मुधोळ मॅडम तुमची भ्रष्टाचार निर्मूलन समिती ही संस्था धर्मदाय आयुक्त कार्यालयामार्फत नोंदणी करण्यात आलेल्या कागदपत्रांची माहिती मागितली मी व डॉक्टर गणेश ढवळे यांनी समितीचे संस्थापक अध्यक्ष यांना समितीचे नोंदणी प्रमाणपत्राचे कागदपत्र मागितले परंतु त्यांनी आम्हाला दिले नाही. यामुळे मी माझ्या मराठवाडा अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला व धर्मदाय आयुक्त कार्यालय यांच्याकडून


नोंदणीचें प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये पुणे विभाग पुणे येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव सत्यमेव जयते प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ई-६०७०/पुणे

श्री तात्यासाहेब ... उदगुडे यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक ५ ९ २०१२ रोजी ... सहीनिशी दिले.

सही ...

सहाय्यक धर्मादाय आयुक्त पुणे विभाग, पुणे

Charity Commissioner


नोंदणी क्रमांकावरून धर्मदाय आयुक्त कडून सत्यप्रती संस्थेच्या हस्तगत केल्या.

यामध्ये सदरील संस्था ही सत्यमेव जयते प्रतिष्ठान या नावाने नोंदणी करत आहे यामुळे मागील कार्यकाळात केलेल्या भ्रष्टाचार समिती म्हणून कामासाठी काही कमी जास्त झाले तर सर्वस्वी जबाबदार श्री चंद्रकांत उदगुडे पाटील राहतील तसेच त्यांनी आमची फसवणूक केली आहे. त्यांची धर्मदाय आयुक्त कार्यालय पुणे येथे सत्यमेव जयते प्रतिष्ठान धर्मदाय रजिस्टर नंबर महा ८५ ई ६०७०/१२ अशी असून त्याबाबतचे

▶ पान २ वर

# बीड जिल्हा रुग्णालयातील आय सी यु मध्ये डॉ. निलेश मिसाळ आयसीयू टीमने वाचवले सर्पदंश झालेल्या महिलेचे प्राण

बीड । प्रतिनिधी





बीड जिल्ह्यामध्ये सर्व सामान्य जनतेच्या हलाखीची परिस्थिती आहे. शेतकरी कुटुंबातील महिला भगिनी आज सुद्धा ग्रामीण भागामध्ये कामाला जात आहेत यातच पावसाळी दिवस सुरू झालेले आहेत आणि सरपंच झालेल्या मागितलेला बाहेर एडमिट करायचं म्हणले तर लाखोचा खर्च येतात. आता बीड जिल्हा रुग्णालय मध्ये दर्जेदार सुविधा मिळत आहेत बीड जिल्हा सर्वश्रेष्ठ ब्रदर मामा मावशी डॉक्टर ने सेवा करत आहेत. त्यातीलच एक भाग म्हणजे एका महिलेला मण्यार नावाचा साप चावल्याने महिलेची प्रकृती खालावली.

प्रेमल रंजीत हावळे वय४५ त्याना शेतात काम करत असताना सर्पदंश झाला व ते जिल्हा रुग्णालयामध्ये तब्बल तीन तासानंतर कॅज्युअल टी मध्ये आले– आल्यानंतर त्यांना अतिशय जास्त प्रमाणामध्ये घाम येत होता व त्यांचे हातपाय उचलत नव्हते पोटातही खूप वेदना होत होत्या व त्यांचे डोळेही जड पडले होते. ते सगळे लक्षण पाहून आम्ही त्यांना अर्जंट आयसीएस शिफ्ट केले व आम्ही त्यांना तातडीने -SV चालू केले. इसवी चालू असताना एएसव्हीची रिएक्शन येऊन त्यांचा बीपी अतिशय खालावला.

तरीपण दोन–तीन तास आम्ही –डत ची ड्रीप चालू ठेवून त्याच्यातून येणाऱ्या ऍडव्हर्स रिएक्शनला काउंटर इंजेक्शन ऍड्रीनालीन (adrena-line) लावून आम्ही त्याच्यावरती मात केली. डॉ निलेश मिसाळ व आयसीयू टीम चव्हाण सिस्टर चंद्रकला सुतार प्रणाली कांबळे कथले ब्रदर अभय मेहरकर ब्रदर सानप सिस्टर जाधव सिस्टर अंजली धवन सिस्टर काजल केत के प्रियांका जगताप सर्व स्तरातून आयसीयू व टीमचे अभिनंदन केले जात आहे.

# जिल्हा परिषद शाळा उपळी येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा



वडवणी । प्रतिनिधी

शाळेला आजपासून सुरुवात झाली असून उपळी येथील जिल्हा परिषद मराठी व उर्दू शाळेत पहिल्या दिवशी विविध उपक्रम घेऊन प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. नवीन वर्षाची सुरुवात म्हणून गावात प्रवेश दिंडी काढण्यात आली. पहिलीत नवीन प्रवेश घेणाऱ्या नवजात विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व त्यानंतर गावातील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मोफत गणवेश, बूट, शॉक्स व पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक राठोड सर यांनी मार्गदर्शन करताना शाळेतील विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती, मध्यांन्ह भोजन योजना, नियमित आरोग्य तपासणी, इयत्ता पहिली साठी सीबीएसइ वर्ग सुरू करण्यात आले असून यावेळी उपस्थित उपळी गावचे सरपंच सचिन हळकर, उपसरपंच विनायक शेळके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा रेणूकताई, आडे, शेख फारूक, फेरोज शेख, बालाजी इचके, अस्लम शेख, बाबमिया शेख, अण्णासाहेब शिंदे, एजाज शेख व सर्व शिक्षक उपस्थित होते.

पान १ वरून...

## गेवराईत लाचलुचपत विभागाची धडक कारवाई; लाच घेतल्याप्रकरणी एकाला अटक

स्वच्छ भारत अभियान विभागात बसलेल्या चव्हाण यांच्यावर कारवाई झाल्याचे समाजात, अन्य कर्मचाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयातून काढता पाय घेतला. दरम्यान, पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी विलास चव्हाण यांच्यावर कारवाई झाल्याची चर्चा आहे. अधिकृत माहिती उपलब्ध नाही. तक्रार काय आहे. तक्रार कोणी केली. या संदर्भात उलटसुलट चर्चा आहे. अन्य काही भ्रष्ट अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या रडावर असल्याची माहिती आहे.

## माझी बदनामी केल्याने कारवाई करण्यात यावी म्हणून न्यायालयात दाद मागणार : इनामदार

सत्यप्रती नक्कल नोंदणीच्या काढल्या आहेत परंतु मी शिक्षक भरती घोटाळ्यामध्ये संबंधित तक्रार केल्यामुळे मी तक्रार परत घेत नसल्यामुळे व माझ्यावरती तक्रार परत घेण्याच्या दबावापोटी श्री चंद्रकांत उधगुडे पाटील यांनी प्रसिद्ध माध्यम यांची दिशाभूल करून माझ्याविषयी पत्र काढले जे पत्रक पाठवण्यात आले भ्रष्टाचार निर्मूलन समिती म्हणून ती पूर्णपणे बनावट खोटी आहे. त्यांची धर्मदाय येथे नियुक्ती असलेली सत्यमेव जयते प्रतिष्ठान आहे. यांनीच स्वत: समितीचे नाव बदलून भ्रष्टाचार केलेला आहे व धर्मदाय आयुक्त कार्यालयाची फसवणूक केली आहे.

मी तक्रार परत घेत नसल्यामुळे संबंधित चंद्रकांत उघडे पाटील यांनी माझ्या बदनामीचे पत्र काढले आहे त्यांच्या विरोधामध्ये मी लवकरच न्यायालयामध्ये दाद मागणार आहे कारण की माझी वैयक्तिक भ्रष्टाचार निर्मूलन समिती या नावाने संस्था रजिस्टर आहे व त्याबाबत भ्रष्टाचार विरोधी जनजागृती करण्यासाठी माझा लढा सुरू आहे ज्यांनी कधीच भ्रष्टाचार विरोधी काम केलं नाही असे लोक माझ्याविषयी बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहेत. मी मागील पंधरा वर्षापासून निवडणूक लोकसभा विधानसभा खर्च घोटाळा २०१९ चा ९ कोटी रुपये वाचवून संबंधित अधिकाऱ्यावरती कारवाई केली ऑक्सिजन निर्मिती घोटाळा संदर्भात संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करून पैसे वसूल करण्याची कारवाई केली इनामी जमीन घोटाळ्यामध्ये तत्कालीन उपजिल्हाधिकारी श्री आघाव पाटील यांच्या वतीने निलंबनाची कारवाई करून गुन्हे दाखल केले. मिलिया शाळा धारूर प्रकरणात मंत्रालयापर्यंत लढून संबंधी शाळेची मान्यता रद्द करून त्या ठिकाणी तीन मजली इमारत बांधून चांगले उत्कृष्ट शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केला.

मुद्रांक शुल्क घोटाळ्यामध्ये कित्येक लायसनधारकांचे परवानिरद्द केले एमआयडीसी मधील भ्रष्टाचा संदर्भात कारवाई केली परंतु माझ्याविषयी बदनामी करणारे व माझ्याविषयी बेकायदेशीर रित्या भ्रष्टाचार निर्मूलन समितीचा मी अध्यक्ष असल्याने माझी अधिकृत नोंदणी असताना सुद्धा भ्रष्टाचार निर्मूलन समिती नाही असे अधिकाऱ्यांना व पत्रकार बांधवांना पत्रक पाठवून बदनामी करणाऱ्या वरती मी अब्रू नुकसान चा दावा दाखल करणार असून चंद्रकांत उदगुडे पाटील यांची सत्यमेव जयते प्रतिष्ठान ही संस्था असताना सुद्धा यांनी पंधरा वर्षांमध्ये कित्येक पदाधिकारी सदस्य यांना भ्रष्टाचार निर्मूलन समिती म्हणून नियुक्त पत्र दिले व आमची फसवणूक करणाऱ्या वरती कारवाई करण्याची मागणी लवकरच करणार आहे अशा भूल थापा देऊन पत्रकार बांधवांची व अधिकाऱ्यांची दिशाभूल करणारे चंद्रकांत उदगुडे पाटील यांच्यावरती कारवाई करण्यासाठी शासन दरबारी न्याय मागणार आहे.

# बाप नावाचा वटवृक्ष!



आईचे गोडवे गाताना अखंड जगाला पाहिले. पण बापाचे गोडवे क्वचितच पाहितले. संसाराचा गाडा हाकण्यासह कुटुंबाचे आर्थिक आणि मानसिक नियोजन करण्यातच हा बाप नावाचा सेवेकरी आयुष्य व्यतीत करताना दिसतो. आभाळभर दु:ख स्वत:च्या उदरी दाबून एकांतात हुंदके देणारा बाप कधी जगाच्या लक्षातच आला नाही. हे बाप नावाच्या हिमालयाचे दुर्दैवच नाही का ?

मागच्या दहा वर्षांपूर्वी वडिलांनी साथ सोडली आणि आयुष्य मृगजळसारखे ती असणारी बापाची ऊब शोधू लागले. जी की कुठेही मिळाली नाही ! आजपर्यंत आणि कधीही न मिळण्याच्या खात्रीसह... म्हणून समाजाच्या आणि कुटुंबाच्या नजरेत कमी येणाऱ्या बापाला विसरणे म्हणजे स्वत:ने स्वत:वर अन्यायच करून घेणे आहे. कारण उत्तरार्धात भेटतात फक्त आठवणी 'बाप नाही' ! असो सकाळी सकाळी स्वप्नांच्या त्या गोड आठवणी ताज्या करून डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या व बापाची आठवण एका प्रसंगाने अलगत करून दिली.!

हॅप्पी फादर्स डे

अशोक दादा ढोले पाटील (लोकशाही पत्रकार संघ महा राज्य बीड शहर उपाध्यक्ष तथा संस्थापक अध्यक्ष सातिराम आणा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड)

# नागरिकांच्या आरोग्यापेक्षा मुख्यमंत्र्यांचा दौरा महत्त्वाचा आहे का? : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील काही भागात जाणून–बजून नाल्या काढण्यात येत नाही. आणि जर नाल्या काढले गेले तरी पंधरा–वीस दिवस ते भरून नेत नाही. ही परिस्थिती तेलगाव नाका पटेल नगर भागात होत आहे. मुकादम स्वच्छता निरीक्षक यांच्याशी संपर्क साधला असता त्यांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्री साहेब २० तारखेला बीड दौऱ्यावर येत असून तिकडे काम चालू आहे. २० तारखे नंतर नाल्या काढून घेऊ.

पण सध्या परिस्थिती अशी झालेली आहे की, पावसाच्या पाण्यामुळे काढलेली घाण रस्त्यावर व परत नाल्यात गेलेली आहे व त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत आहे.

एकीकडे 'स्वच्छ बीड ' सुंदर बीड ' या मोहिमांतर्गत बीड नगरपालिकाच्या मुख्याधिकारी नीताताई अंधारे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात नालेसफाई काम सुरू आहे. मात्र काही कर्मचारी आणि मुकादमच नाही तर स्वच्छता निरीक्षक हे सुद्धा ऐकायला तयार नाही. दुर्गंधीमुळे मच्छराचा प्रादुर्भाव वाढत आहे. नागरिकाचे आरोग्य धोक्यात आले असून, श्वास घेणे ही मुश्किल झाले आहे. माझी व नागरिकाचे मा. मुख्याधिकारी नीताताई अंधारे मॅडम यांना विनंती आहे की, त्यांनी लक्ष द्यावे. तसेच संबंधी निष्काळजी कर्मचाऱ्यावर योग्य ती कारवाई करावी. अशी जोरदार चर्चा नागरिकांतून होत आहे.



## ज्ञानराधा प्रकरणात ठेवीदारांना न्यायासाठी मोफत विधी सहाय्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टिस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या ठेवीदारांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल करण्यासाठी मोफत विधी सहाय्य (त्रीशश ङशसरश्र –ळव) मिळावे, यासाठी विधी सेवा उप–समितीकडे अर्ज केला आहे. अर्जदार शिवाजी बुकाराम पतंगे (रा. सोनावळा, ता. अंबाजोगाई, जि. बीड) आणि त्यांच्या सोबत असलेल्या इतर ठेवीदारांनी या संदर्भात आर्थिक अडचणी मुळे न्यायालयीन लढाई शक्य नसल्याचे नमूद केले आहे.

संबंधित सहकारी संस्थेवर सेंट्रल रजिस्ट्रारने लिक्विडेटरची नियुक्ती केली असून, ठेवीदारांनी आपले हक्काचे पैसे मिळवण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक ते क्लेम दाखल केले आहेत. तथापि, अजूनही एकाही ठेवीदाराला पैसे मिळालेले नाहीत. याशिवाय, चझखऊ कायद्यांतर्गत संस्थेची मालमत्ता जप्त करण्यात आली असून तिची विक्रीसंदर्भातील प्रक्रिया छउङढ न्यायालयात सुरू आहे.

काही ठेवीदारांना उपासमारीची वेळ आली आहे. अनेक महिने थांबूनही आम्हाला आमचे पैसे मिळाले नाहीत. म्हणूनच आम्ही आता उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचे ठरवले असून त्यासाठी मोफत विधी सहाय्याची विनंती केली आहे, असे शिवाजी पतंगे यांनी सांगितले.

या प्रकरणात ठेवीदारांच्या वतीने ॲड. प्रविण नेहरकर हे कायदेशीर सल्लागार म्हणून काम पाहत असून, लवकरच रिट याचिका उच्च न्यायालयात दाखल होणार आहे. ठेवीदारांनी सेंट्रल रजिस्ट्रार, लिक्विडेटर, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, सहकार मंत्रालय आदी संबंधित यंत्रणांकडेही आपल्या तक्रारी मांडलेल्या आहेत, मात्र अद्याप ठोस कृती झालेली नाही. सर्वसामान्य ठेवीदारांचे हक्क वाचवण्यासाठी उच्च न्यायालयात लढा देणे आवश्यक झाले आहे, असेही अर्जात नमूद करण्यात आले आहे.

# जुन्या भांडणाची कुरापत, आरोपींवर गुन्हा दाखल

नेकनूर । प्रतिनिधी

जमीन मोजणीच्या भांडणाची कुरापत काढून लाथा बुक्क्याने मारहाण केली. यामध्ये तीन आरोपींवर गुन्हा दाखल केला असून नेकनूर पोलीस स्टेशनचे पोलीस पुढील तपास करत आहेत.

काल सात वाजता महादेव लिंबाजी भोसले वय ४० वर्ष व्यवसाय शेती राहणार खर्डेवाडी, बीड यांना शिवर शेत वस्ती खर्डेवाडी येथे नागनाथ रामा भोसले, किसन नागनाथ भोसले, अमोल नागनाथ भोसले सर्व राहणार खरडेवाडी यांनी संगणमत करून जमीन मोजणीच्या भांडणाचे कुरापत काढून यातील आरोपींनी शिवीगाळ करून उजव्या कपाळावर दगडाने मारहाण करून दुखापत केली. काठीने व लाथा बुक्क्याने मारहाण करून मुक्कामार दिला. व जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणून नेकनूर पोलीस स्टेशनमध्ये काल गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नेकनूर पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत.

## मॉर्निंग वॉक करत असताना दिली जोराचे धडक; अज्ञात वाहत चालकावर गुन्हा दाखल

तलवाडा । प्रतिनिधी

मॉर्निंग वॉक करून घरी परत येत असताना एका वृद्धाला अज्ञात वाहन चालकाने समोरून येऊन जोराची धडक दिली. या धडकेत वृद्धाला जबर मार लागला असून अज्ञात वाहन चालकावर तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१९ मे रोजी सकाळी पाच वाजता मॉर्निंग वॉक साठी गेलेले असताना मॉर्निंग वॉक करूत घरी परत येताना भेंड खुर्द फाट्याजवळ हॉटेल सह्याद्री जवळ गडी ते माजलगाव कडे जाण्याच्या रोडवर अज्ञात वाहन चालकाने त्यांच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालून भरधाव वेगातून वृद्धाला समोरून जोराची धडक दिली. या धडकेत वृद्धाच्या पायाला हाताला पोटाला गंभीर मार लागून जखमी केले. या प्रकरणात काल दुपारी अडीच वाजता वृद्धाच्या मुलाने तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये येऊन अज्ञात चालकावर गुन्हा दाखल केला. पुढील तपास तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत.

# शिक्षण क्षेत्राला दिशा देणारे पुस्तक : शाळा एके शाळा

द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीड येथे कार्यरत असणारे सहशिक्षक श्री. माधव अरूणराव डाके लिखित 'शाळा एके शाळा' ही लघुकादंबरी. पुस्तकाच्या शिर्षकावरूनच हे पुस्तक शिक्षणक्षेत्राशी संबंधित असल्याचे लक्षात येते. माधव डाके हे स्वत: शिक्षक म्हणून एका शाळेत काम करत असल्याने शिक्षण संस्था, संस्थाचालकांचा शाळेच्या प्रगतीबद्दलचा दृष्टीकोन, मुख्याध्यापकाला संस्था व शिक्षक यामधील दुवा म्हणून काम करीत असताना प्रशासन चालवताना करावी लागणारी कसरत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे मनोभाव यांचे त्यांनी जवळून निरीक्षण केलेले असल्याने ही कादंबरी लिहीताना त्यांनी शिक्षणक्षेत्राच्या वास्तविकतेशी सांगड घातली आहे.

पुस्तकास पत्रकार, साहित्यिक स्वर्गीय प्रा. एकनाथ आबुज यांची प्रस्तावना लाभलेली असून ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांचा शुभेच्छा संदेश आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक आणि बोलके आहे. एक चांगला मुख्याध्यापक उत्तम शिक्षक असतोच असे नाही तसेच एक चांगला शिक्षक चांगला मुख्याध्यापक बनु शकतोच असे नाही असे म्हटले जाते. एक चांगला मुख्याध्यापक शाळेला केवळ एक इमारत नाही, तर एक समुदाय बनवतो, जिथे विद्यार्थी आणि शिक्षक एकत्र शिकतात आणि वाढतात. एक चांगला मुख्याध्यापक हा शाळेला दिशा देणारा आणि एक मजबूत नेता असतो. माधव डाके यांनी अरूण भिडे या आदर्श शिक्षक व मुख्याध्यापकाचे व्यक्तीचित्र पुस्तकात रेखाटले आहे.





अरूण भिडे हे संस्थेतील एका शाळेवर उपमुख्याध्यापक पदावर कार्यरत असतात. कडक शिस्तीचे व हाडाचे शिक्षक म्हणून त्यांची ख्याती असते. संस्थेचीच संस्कार विद्यालय नावाची एक दुसरी माध्यमिक शाळा. जिची अवस्था नावाच्या अगदी विपरीत असते. शाळेचे मुख्याध्यापक अकर्तव्यदक्ष असल्याने शाळेचे दैनंदिन कामकाज रामभरोसे चालत असते. कामचुकार शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, शिस्त नसणारे व शाळेत अनियमित उपस्थिती दर्शवणारे विद्यार्थी यामुळे शाळेची एकूण गुणवत्ता फार खालावलेली असते. ना शहर म्हणाव ना गाव अशा ठिकाणी असणारी ही शाळा असल्याने पालकही शिक्षणाच्या बाबतीत उदासिन. शाळेचे मुख्याध्यापक संस्थाचालकांचे जावई असल्याने ते सर्व काही माहित असताना सुद्धा याबाबतीत मुख्याध्यापकांना काही बोलु शकत नाहीत. या संस्कार विद्यालयाच्या अकर्तव्यदक्ष मुख्याध्यापकांच्या सेवानिवृतीनंतर जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती असणारे संस्थेचे सचिव अरूण भिडे सरांना पदोन्नती देवून संस्कार विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करतात.

संस्कार विद्यालयाच्या मुख्याध्यापक म्हणून पदभार स्विकारल्यानंतर पहिल्याच दिवशी भिडे सरांच्या लक्षात येते की, त्यांच्या पूढे खूप मोठी आव्हाने आहेत. माणसाच्या ठिकाणी प्रबळ ईच्छाशक्ती असेल, डोळ्यासमोर विशिष्ट ध्येय असेल आणि ते साध्य करण्यासाठी कठिण परीश्रम करण्याची तयारी असेल तर अशक्य ते शक्य करता येते. भिडे सर हे शिवधनुष्य उचलतात. सुरुवातीला ते शाळेतील शिक्षकांचे समुपदेशन करतात. शाळेतील विद्यार्थ्यांचे मित्र बनतात. त्यांच्यात मिळून – मिसळून त्यांना शिस्त व अभ्यासाची गोडी लावतात. वेळोवेळी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतात. यामुळे अल्पावधीतच ते विद्यार्थी प्रिय होतात. सुरूवातीला त्यांना विरोध करण्याची भाषा करणारे काही शिक्षक आपला विरोध सोडून देतात. संस्थेचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन, शिक्षकांचे सहकार्य, भिडे सरांचे उत्तम प्रशासन यामुळे लयाला गेलेली ही शाळा भिडे सरांनी मुख्याध्यापक म्हणून पदभार स्विकारल्यानंतर अगदी कमी काळात नावारूपाला येते.

शाळेची शिक्षक सभा, शाळेत चालणारे विविध उपक्रम आणि कार्यक्रम याचे यथोचित वास्तव चित्र उभा करण्यात लेखक यशस्वी झाल्याचे दिसून येते. 'राजा कालस्य कारणम' या उक्तीप्रमाणे राज्याची प्रगती असो अथवा अधोगती यास त्या त्या कालखंडातील राजाचे कर्तृत्व कारणीभूत असते, त्याप्रमाणे विद्यालयाचा प्रमुख हा मुख्याध्यापकही विद्यालयाच्या प्रगती अथवा अधोगतीस कारणीभूत असतो. म्हणून जर मुख्याध्यापक खास असेल तर विद्यालयाचा सर्वांगीण विकास हा हमखास होणारच. यात कोणाचेही दुमत असणार नाही. आणि हाच मुख्याध्यापक कर्तृत्ववान नसेल तर विद्यालयाच्या अधोगतीसही वेळ लागणार नाही. मुख्याध्यापक हा शिक्षक व प्रशासन याना जोडणारा दुवा असतो. त्या दोघांमधील सुवर्णमध्य साधणारा असतो. म्हणून मुख्याध्यापकामध्ये तेवढी विचारांची, अनुभवाची परिपक्वता असली तर तो विद्यालयाला नंदनवन बनवणारा महत्वाचा घटक ठरतो. त्याच्यामध्ये उत्कृष्ट सारथ्य असेल तर तर विद्यालयाचा रथ योग्य प्रगतिपथावरुन ध्येयपूर्तीकडे नेल्याशिवाय राहणार नाही.

माधव डाके सरांनी साध्या सरळ परंतु ओघवत्या वर्णन शैलीत हे पुस्तक लिहिलेले आहे. हे पुस्तक हाती घेतल्यानंतर पूर्ण वाचल्याशिवाय हातातुन सुटत नाही. 'शाळा एके शाळा' हे पुस्तक केवळ मुख्याध्यापकांसाठीच वाचनीय नाही तर संस्थाचालक, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रत्येकाने वाचावे असे आहे. माधव डाके सरांना पूढील लेखन कार्यासाठी खूप–खूप शुभेच्छा!

पुस्तक – शाळा एके शाळा
लेखक – माधव डाके.
प्रकाशक – कल्पना प्रकाशन, बीड
किंमत – १०० रुपये.
पुस्तक परीक्षण :
–सुरेश मंत्री, अंबाजोगाई.
संपर्क– ९४०३६५०७२२

# अल्मा फातिमा ने बीड जिल्ह्याचे नाव देशभरात गाजवले

## NEET परीक्षेत मिळविली ऑल इंडिया रँक २६५२; एम्समध्ये एमबीबीएसची जागा निश्चित



बीड । प्रतिनिधी

शहरातील अल्मा फातिमा असद अली या विद्यार्थिनीने नुकत्याच जाहीर झालेल्या नीट परीक्षेच्या निकालात घवघवीत यश संपादन करत श्रेणी रँक ९४० आणि ९९.८७ पर्सन्टाईल मिळविले आहे. या दणदणीत निकालामुळे तिची सुप्रसिद्ध एम्स रुग्णालयामध्ये एमबीबीएसची जागा निश्चित झाली आहे. तिच्या या यशामुळे शाहीन अकॅडमी बीड मध्ये तिचा पालकांसोबत जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. अब्दुल कादिर, अब्दुल हसीब सर आणि अब्दुल मुकीद सर ही त्रिमूर्ती फक्त सधन घरातील विद्यार्थीच चांगले घडवीत आहेत असे नाही तर समाजाच्या तळागाळातील विद्यार्थ्यांना सुद्धा मदतीचा हात देत, त्यांच्यातील गुणवत्ता हेरून, त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून यशस्वी करत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शाहीन अकॅडमी मध्ये अशारीतीने उत्कृष्ट शिक्षण देण्याचे कार्य केले जात आहे. या अकॅडमीच्या देशभरात अनेक शाखा आहेत. या सर्वच शाखांमध्ये शाहीन अकॅडमीचे विद्यार्थी उल्लेखनीय यश मिळवीत आहेत. बीड शहरासह संपूर्ण भारतात आणि परदेशात सुद्धा शैक्षणिक संकुले सुरू करण्यात आली आहेत. विभागीय कार्यालय बिदर कर्नाटक येथे शाहीन अकॅडमीच्या पहिल्या शाखेची सुरुवात करण्यात आली होती. तिथे लावलेल्या या शैक्षणिक रोपट्याचे आज संपूर्ण भारत भरात अनेक ठिकाणी शाखा आहेत. प्रत्येक शाखेमध्ये पहिली शाखा असलेल्या बिदर सारखेच शिक्षणतज्ञ शिक्षक कार्यरत आहेत. बीड शहराची शाखा सुद्धा याला अपवाद नाही. येथेही तज्ञ व पारंगत शिक्षक विद्यार्थ्यांच्या दिमतीला आहेत. यामुळेच अल्मा फातिमा सारखी विद्यार्थिनी स्वतःच्या अभ्यासासोबतच तज्ञ शिक्षकांनी शिकविलेल्या शिक्षणामुळे नीट च्या परीक्षेत मोठी झेप घेऊ शकली. आणि संपूर्ण भारतातून नीट परीक्षा दिलेल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये दणदणीत यश मिळवू शकली. तिने मिळविलेल्या यशामुळे प्रसिद्ध एम्स मध्ये तिची एमबीबीएस साठी जागा निश्चित झाली आहे.

या दणदणीत निकालामुळे शाहीन अकॅडमी बीड कडून अल्मा आणि तिच्या पालकांचा विशेष सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात नवीद उज्जमा, फखरुज्जमा, डॉक्टर फिरोज शेख, माजी उपनगराध्यक्ष फारुख पटेल, जमीयत उलमा ए हिंदचे बीड जिल्हाध्यक्ष मुफ्ती अब्दुल्ला, मौलाना साबीर, अश्फाक इनामदार, ज्येष्ठ पत्रकार सी.आर.पटेल, पत्रकार जावेद पाशा, नबिल उज्जमा, गुलाम साकिब, मुज्तबा खान सर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट बीडचे शाखाप्रमुख प्रा.डॉ. इम्रान मुनीर खान यांनी आभार व्यक्त केले.

## कुंभेफळ येथे नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागत उपक्रमातंर्गत अक्षय मुंदडाची भेट



बीड । प्रतिनिधी

आज भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुंभेफळ (ता. अंबाजोगाई) येथे महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सव व नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागत उपक्रमांतर्गत केज विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते व पणगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन अक्षय भैय्या मुंदडा (भैय्यासाहेब) यांनी सदिच्छा भेट दिली. शाळेचा पहिला दिवस चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह आणि थोडीशी धाकधूक घेऊन आला होता. नव्याने प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांचे उत्साहपूर्वक स्वागत करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी गट शिक्षणाधिकारी मा.सुवर्णकार साहेब, मा.विलास काका सोनवणे, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, कुंभेफळ गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षकवृंद व पालक यावेळी उपस्थित होते.

# अशोक वीर यांनी स्वखर्चातून केला रस्ता



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी नाका इमामपूर रस्त्या लगत असलेला प्रकाश आंबेडकर मधील अंतर्गत रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून या भागाकडे लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे. या भागातील बहुतांश नागरिक हे मोल मजुरी व ऊसतोड मजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात म्हणून हा भाग दुर्लक्षित आहे. सध्या पावसाचे दिवस असल्याने प्रकाश आंबेडकर नगर भागातील अंतर्गत रस्त्यावर पायी चालणे देखील मुश्किल झाले होते. बहिरवाडीचे माजी सरपंच अशोक वीर यांनी स्वखर्चातून आपल्या सहकार्याच्या माध्यमातून मुरुम टाकून रस्ता केला.

समाजासाठी काहीतरी चांगलं करावं या भावनेतून माजी सरपंच अशोक वीर यांनी रस्त्यावर मुरूम टाकून रस्ता चालणे योग्य केल्याने समाजापुढे व लोक प्रतिनिधीना एक आदर्श निर्माण केला आहे. प्रकाश आंबेडकर नगर भागातील रस्त्याची अत्यंत खराब अवस्था पाहून त्यांनी कोणत्याही सरकारी निधीची किंवा नेत्याची वाट न पाहता खर्चातून रस्ता केला. या रस्त्यामुळे परिसरातील शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक यांना मोठा दिलासा मिळाला आहे. स्थानिक नागरिकांनी त्यांच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक करत खरंच लोकसेवा कशाला म्हणतात हे अशा उदाहरणांतून कळतं अशा शब्दांत भावना व्यक्त केल्या.

अशोक वीर हे यापूर्वी प्रकाश आंबेडकर नगर भागात विविध सामाजिक उपक्रम राबवून बहिरवाडी सरपंच पदाची माळ आपल्या गळ्यात पाडली होती.आजही कोणतेही पद नसतानाही त्यांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून हा रस्ता तयार करून दिला. यावेळी शहादेव वंजारे, बंडूकदम, मोराळे व देवकते यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याने चालण्यास मुश्कील असलेला रस्ता मुरूम टाकून पायी चालले योग्य झाला त्यामुळे प्रकाश आंबेडकर नगर रमाई नगर भागातील नागरिकांनी अशोक वीर यांचे आभार मानले.



मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे यांना वाढदिवसाच्या मंगलमय शुभेच्छा देताना पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक मोंदी, राज संपादक उत्तम ओव्हाळ, पोलिस हवालदार विलास ठोंबरे, पोलीस हवालदार रमेश भोले, वैभव सरवदे व इतर

## आरोग्यदूत मंगेश चिवटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा



बीड । प्रतिनिधी

रुग्णसेवा म्हणजे ईश्वर सेवा याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे मंगेश दादा चिवटे, गेल्या अनेक वर्षांपासून मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना मदत करणारे, महाराष्ट्राचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे विश्वासु तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी प्रमुख मंगेश चिवटे सर हे सर्वांना परिचित आहेतच. वाढदिवस म्हटलं की केक हारे, तुरे, डीजे असा अवाढव्य खर्च आला. परंतु या खर्चाला फाटा देत शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड, धर्मवीर प्रतिष्ठान, बाजीराव दादा चव्हाण मित्रपरिवार व रुग्णसेवक शरद झोडगे आणि रुग्णसेवक शिवराज आंधळकर यांच्या माध्यमातून मंगेश दादा चिवटे यांचा वाढदिवस बीडमध्ये विविध सामाजिक उपक्रम घेऊन साजरा केला. यामध्ये भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या शिबिरामध्ये जो रक्तदान करेल त्याला एकनाथ रक्तदाता सुरक्षा कवच योजना म्हणून दशलक्ष रुपयांचा अपघाती विमा मोफत देण्यात आला. यानंतर बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे अन्नदान व फळ वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. जिव्हाळा वृद्धाश्रमातील शुभेच्छा मंगेश दादा चिवटे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे स्वीकारल्या व रुग्णसेवक शरद झोडगे व रुग्णसेवक शिवराज आंधळकर आणि बाजीराव दादा चव्हाण मित्रपरिवाराचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला उपस्थित शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख रुग्णसेवक शरद झोडगे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख रुग्णसेवक शिवराज आंधळकर, युवा नेते अजय जाधव, सुरज निर्मळ, संकेत पाळवदे, किशोर हांगे, सौरभ कुचेकर, हुसेन शेख, सचीन हेगडे, गजानन हेगडे आदी पदाधिकारी व मित्रपरिवार उपस्थित होते.

## अभिजीत मुंडेचे निट परीक्षेत घवघवीत यश

### वैद्यकीय प्रवेश निश्चीत सर्वत्र कौतुक

धारूर । प्रतिनिधी

तालूक्यातील भायजळी गोपाळपूर येथील ऊसतोड कामगार कुटुंबातील विद्यार्थी अभिजीत माणिक मुंडे याने वैद्यकीय प्रवेश पूर्व नीट परीक्षेत ५१८ गुण घेऊन वैद्यकीय प्रवेश निश्चित केला आहे. त्याने आपल्या सर्व परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



तालुक्यातील भाईजळी गोपाळपूर येथील ऊसतोड कामगार कुटुंबातील युवक अभिजीत माणीक मुंडे याने नीट परीक्षेत ५१८ गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले असून आपल्या परिस्थितीवर मात करत त्याने मिळवलेल्या या यशाने आपला वैद्यकीय प्रवेश निश्चित केला आहे. ऑल इंडिया रँक ३३६६९ क्रमांक तर ओबीसी कॅटेगिरी मध्ये १५६६४ वा क्रमांक मिळवला आहे. त्याने मिळवलेल्या या घवघवीत यशाचे सर्वत्र कौतुक होत असून त्याचा वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश निश्चित किती झाल्याने सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे.

# रूपाली देशपांडे यांच्या पुढाकाराने बीडमध्ये प्रथमच महिलांची ट्रेकिंग सहल यशस्वी

## कर्जनीच्या निसर्गरम्य डोंगरावर ट्रेकिंग करून महिलांनी घेतला मनसोक्त आनंद

बीड । प्रतिनिधी

धडाडीच्या सामाजिक कार्यकर्त्या, स्तंभ लेखिका आणि सुप्रसिद्ध रीच टूर्स अँड ट्रॅव्हल्स च्या संचालिका रूपाली देशपांडे यांनी प्रथमच महिलांची ट्रेकिंग ट्रिप काढण्याचे आवाहन केले होते. या आव्हानाला प्रतिसाद देत पहिल्याच प्रयत्नात थोडे थोडके नव्हे तर चक्क २८ ते ३० महिला रविवार दिनांक १५ जून २०२५ रोजी पहाटे ०६:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे एकत्रित येऊन बीड पासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या कर्जनीच्या डोंगर माथ्यावर ट्रेकिंग साठी गेल्या आणि तिथे निसर्ग सानिध्याचा मनसोक्त आनंद घेतला. रूपाली देशपांडे यांनी महिला वर्गाची ट्रेकिंग प्रथमच घडवून आणली असून आता नियमितपणे महिलांना एकत्रित करून त्या ट्रेकिंग साठी घेऊन जाणार असल्याचे त्यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

तसेच ट्रेकिंग विषयी मत मांडताना त्यांनी नमूद केले आहे की, आज काल धकाधकीच्या जीवनात पुरुष असो की महिला सर्वांना ताण–तणावाखाली रहावे लागत आहे. यामुळे प्रकृती स्वास्थ्याकडे विशेष लक्ष देण्याची नितांत गरज आहे. जर वेळीच आपल्या प्रकृतीकडे लक्ष दिले नाही तर आरोग्याच्या समस्या उद्भवतात. यामुळे खूप त्रास सहन करावा लागतो. म्हणून डोंगरदऱ्यात ट्रेकिंग करणे हा सुदृढ शारीरिक आणि मानसिकतेसाठी एक अत्यंत चांगला आणि निसर्ग सानिध्यात व्यायाम म्हणून करणे खूप चांगले असते. हा विचार करून प्रथमच महिलांसाठी ही ट्रेकिंग ट्रिप काढली. याला जवळपास २५ ते ३० महिलांनी सोबत येत चांगली साथ दिली आणि एक चांगली निसर्गरम्य ट्रेकिंग ट्रिप पार पडली.



या ट्रेकिंग ट्रिप मध्ये रुपाली देशपांडे यांच्यासह सविता देव, स्वाती राजूरकर, रुपाली कुलकर्णी, सुषमा मुथ्था, गायकवाड शोभा, सुरभी खोपटीकर, अंकिता देशपांडे, मीनाक्षी क्षीरसागर, माया तेलंग,

सानिका पटाईत, साक्षी पटाईत, आशा शिंदे, शुभांगी पांडे, सोनाली देशमुख, मनीषा घुले, अपर्णा स्वामी, मनाली कुलकर्णी, प्रियंका लोणकर, मिनाक्षी भोसले, करुणा अडसकर, वैशाली जोशी, मनीषा साळवे, विजया सोनवणे आदींसह इतरांची ही उपस्थिती होती. यापैकी अनेकींनी या ट्रेकिंग ट्रिप विषयी बोलताना अनेक चांगल्या व सकारात्मक बाबी विशद केल्या.

## जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय आणि आदित्य शिक्षण संस्था संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रवेश संबंधी बैठक




बीड । प्रतिनिधी

दिनांक १५ जून २०२५ रोजी आदित्य शिक्षण संस्था संकुल तेलगाव रोड बीड येथे आयटीआयच्या प्रवेशा संबंधी जिल्ह्यातील सर्व खाजगी व शासकीय आयटीआय यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्त जिल्ह्यातील पूर्ण प्रवेशाचा आढावा घेण्यात आला.

जिल्ह्यामध्ये एकूण बारा शासकीय आयटीआय व १६ खाजगी आयटीआय उद्योग क्षेत्रात आयटीआय शिक्षण घेतलेल्या कुशल कामगारांची गरज आहे त्यानिमित्त संपूर्ण जिल्ह्यात आयटीआय मध्ये १००% प्रवेश होणे आवश्यक आहे आणि त्याचबरोबर दर्जेदार प्रशिक्षणाची गरज आहे त्यानिमित्त जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी डॉ. उखळीकर साहेब यांनी सर्वांना मार्गदर्शन केले अशी बैठक जिल्ह्यामध्ये प्रथमच अशी बैठक घेण्यात आली आहे.

त्यानिमित्त आदित्य शिक्षण संस्था चे चेअरमन श्री आदित्य सारडा यांनी कौतुक केले आहे. याप्रसंगी आदित्य आयटीआयचे प्राचार्य श्री वाघ सर बीड जिल्हा प्रवेश समन्वयक श्री पवन रामदासी व परीक्षा समन्वयक श्री महादेव बारगजे सर यांनी सुद्धा प्रवेश आणि परीक्षेबाबत सूचना केल्या.



बीड : बालेपीर येथे शेख युसुफ यांच्या विवाहप्रसंगी शुभेच्छा देताना फहीम इनामदार, अॅड. सय्यद साजेद, पोलिस बॉईज असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रविंद्र शिनगारे.

### सिरसाळा येथे १० वी १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

## नालंदा अभ्यासिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरावर आधारित पुस्तकांचा संच दान



सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा (ता. परळी) दिनांक १५/०६/२०२५ वार रविवार रोजी सम्राट अशोक बुद्ध विहार सिरसाळा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. सुभाष जिजा चोपडे हे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. दयानंद झिंजुर्डे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमा पूजन व वंदनेने करण्यात आली. यानंतर जयंती उत्सव समिती च्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत उत्तम यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा बुके देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख मार्गदर्शक प्रा. झिंजुर्डे यांनी आपल्या प्रभावी भाषणातून विद्यार्थ्यांना ध्येय निश्चिती, सातत्यपूर्ण अभ्यास आणि प्रामाणिक प्रयत्न यांचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या उदाहरणातून शिक्षणाची प्रेरणा देत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व समाजकार्याच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन केले.

अध्यक्ष सुभाष जिजा चोपडे यांनी आपल्या समारोपाच्या भाषणातून कार्यक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना शिस्त, मेहनत आणि संस्कारांची गरज अधोरेखित केली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षक व पालकांचा वाटा किती महत्त्वाचा आहे, यावरही प्रकाश टाकला. याप्रसंगी अमोल किरवले यांनी नालंदा अभ्यासिकेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरावर आधारित पुस्तकांचा संच दान केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास बनसोडे सर यांनी, तर आभार प्रदर्शन साहेबराव किरवले सर यांनी केले. कार्यक्रमाला बुद्ध बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# अमृत जल योजनेची सखोल चौकशी करा

■ बीड शहर बचाव मंचाची जनतेच्या वतीने मागणी ■ पालकमंत्र्यांनी या प्रकरणांमध्ये तात्काळ लक्ष घालण्याची गरज आहे. या योजनांची सखोल चौकशी करण्यात यावी भुयारी गटार योजनेचे काय झाले...? त्यासाठी मिळालेला शेकडो कोटी रुपये निधी कुठे गेला..?

■ विस्तारित पाण्याच्या टाक्या बांधूनही बराच काळ उपयोगात नसल्यामुळे अजूनही उपयोगशील आहेत का ? याची तपासणी करण्यात यावी.

बीड । प्रतिनिधी

बीड शहर बचाव मंचाच्या टीमने नुकतीच बीड शहरातील बऱ्याच भागांमध्ये अमृत जल योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या विस्तारीत पाण्याच्या टाक्या व पाणीपुरवठा नळ योजनेची पाहणी केली. बऱ्याच कालावधीपासून इन्फ्रास्ट्रक्चर पूर्ण तयार झालेले असून सुद्धा अमृत जल योजना कार्यान्वित का केली जात नाही..?

हा बीड च्या जनतेपुढे पडलेला फार मोठा प्रश्न आहे. केंद्र शासनाकडून शेकडो कोटी रुपये या योजनेसाठी पुरविण्यात आले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगरपालिका प्रशासन अशा संयुक्त पद्धतीने ही योजना राबविण्यात आली. नगरपालिकेकडून योजना हस्तांतरित करून घेऊन मोठ्या थाटामाटात त्या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या विस्तारीत पाण्याच्या टाक्यांचे उद्घाटन सोहळे करण्यात येऊन लोकार्पण करण्यात आले. हजारो हजारो घरांना निळ्या पाईपचे कनेक्शन्स देण्यात आले. पाणी पुरवठ्याचे ट्रायल्स' देण्यात आले. या योजनेतून दिलेले नळ घरोघर आज निकामी पडून आहेत. अशाप्रकारे एका मोठ्या जलपुरवठा योजनेचे वाटोळे जर बारामती मध्ये किंवा पुणे जिल्ह्यामध्ये झाले असते तर माननीय पालकमंत्री अजित दादा आपण हे असेच सहन केले असते का ..?? असा प्रश्न बीड शहरातील जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंच' आपल्यासमोर मांडत आहे.

अमृत जल योजना शेकडो कोटी रुपये खर्च करून देखील अयशस्वी झाली. केंद्र शासनाच्या शेकडो कोटी रुपयांचा नासाडा करण्यात आला. फार मोठा भ्रष्टाचार या योजनेत झाला आहे, याची शक्यता नाकारताच येत नाही. ही योजना योग्य पद्धतीने प्रामाणिकपणे राबवण्यात आली असती तर बीडच्या जनतेचा पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याचा प्रश्न कधीच सुटला असता व बीडकरांना पाण्यासाठी वणवण हिंडावे लागले नसते. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याची होणारी भीषण टंचाई थांबवण्यात यश आले असते आणि बीडच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटला असता यात काहीच शंकाच नाही.

अशाच प्रकारे भुयारी गटार योजनेसाठी देखील मोठ्या प्रमाणामध्ये शासनाकडून निधी आलेला होता. भुयारी गटार योजना कुठ आहे...? त्यासाठी मिळालेला निधी कुठे गेला..? भुयारी गटार योजनेच्या अंतर्गत फिल्टर प्लांट उभा करण्यासाठी जमीन घेतली होती व फिल्टर प्लांट उभा करण्यात येणार होता. कुठे आहे तो फिल्टर प्लांट ? त्या फिल्टर प्लांट चे व त्यासाठी खरेदी केलेल्या जमिनीचे काय झाले ...?? भुयारी गटार योजना कोणी व कशी जिरवली ?? याची जवाबदारी कोणावर आहे?

या योजना विकासाच्या कुठल्या टप्प्यावर आहेत, कधीपासून कार्यान्वित होतील, शासनाने जनतेसाठी शेकडो कोटी रुपये खर्च केल्यानंतरही या योजना बारगळत पडल्या आहेत याचा लाभ जनतेला कधीपासून मिळणार याचा खुलासा प्रशासनाकडून व संबंधित नेत्या पुढार्यांकडून तात्काळ करण्यात यावा ही मागणी जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंचा कडून करण्यात येत आहे.






## महाराष्ट्र आधार सेनेमुळे दिनदलित शोषितांना मिळणारा आधार

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष व सांज दैनिक महाराष्ट्र आरंभ चे संपादक दीपक भाऊ थोरात यांनी महाराष्ट्र आधार सेनेचा उद्घाटन सोहळा मोठ्या थाटात संपन्न केला व या सोहळयाला उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा देऊन एक प्रकारे या संघटनेला आधार दिला. आता या संघटनेमुळे महाराष्ट्रातील दिनदलित शोशितांना आता मात्र खंबीर आधार मिळाला आहे.

आजपर्यंत अनेक सामाजिक राजकीय संघटना दलित समाजातील बांधवांनी काढल्या. परंतु संकटकाळी मात्र फार कमी संघटनेने अन्याय झालेल्या लोकांना आधार दिला परंतु आता महाराष्ट्र आधार सेना अन्याय विरोधात



लढणार आहे व ना जात ना पात एक मदतीचा हात असे ब्रीदवाक्य घेऊन संघटना आता गोरगरिबांना सर्व जाती धर्मातील घटकांना सोबत घेऊन काम करणार आहे तसे पाहिले तर दीपक (भाऊ) थोरात यांनी आजपर्यंत आपल्या आयुष्य समाजकार्यात घातले आहे. आता इथून पुढे ते समाजाला न्याय देण्यासाठी झटणार असल्याचे त्यांनी सांगितले. उद्घाटन सोहळ्याला हजारो कार्यकर्ते स्वखर्चाने उपस्थित राहिले नाहीतर एखादा कार्यक्रम ठेवायचा म्हटलं तर पैसे देऊनही लोक येत नाहीत परंतु काही न देता लोक आपल्या स्वत:च्या वाहनाने उपस्थित राहून आम्ही तुमच्या पाठीशी आहोत तुम्ही फक्त लढ म्हणा असे म्हणत उपस्थित राहून एक सामाजिक बळ एक सामाजिक ताकद संघटनेच्या पाठीशी असल्याचे दाखवून दिले त्यामुळे आता या महाराष्ट्र आधार सेनेच्या नावाची सर्वत्र चर्चा होत आहे. राजकीय वर्तुळात या महाराष्ट्र आधार सेनेचा बोलबाला होत असताना दिसत आहे.

## महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना ही कामगारांची हित जोपासणारी संघटना : बाबूराव पोटभरे

माजलगाव । प्रतिनिधी

दिनांक १५ जून रोजी महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या वतीने नोंदणीकृत कामगार यांना माजलगाव येथे गृहुपोगी साहित्य बहुजन विकास मोर्चा संस्थापक अध्यक्ष बाबूरावजी पोटभरे यांच्या अध्यक्षा खाली संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांच्या प्रमुख उपस्थित वितरित करण्यात आले



या बाबत पोटभरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले समाजातील विविध घटकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र शासन यांचेवतीने कामगारांच्या हिता साठी जे पाठपुरावा महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना करत आहे मी संघटनेचा कौतुक करेल भविष्य काळामध्ये जर आपण संघटित राहिलो तरच कामगारांचे अस्तित्व शिल्लक राहणार आहे असे परखड मत व्यक्त करून विविध संघटना व विविध चळवळी त्यांच्यामध्ये सुरू असलेले राजकारण, हेवेदावे यामुळेच कामगार वर्ग तसेच चांगल्या चळवळी अडचणीत येत असल्याचे स्पष्टपणे बहुजनांचे नेते बाबुराव पोटभरे यांनी सांगितले. येणाऱ्या काळात संघटनेच्या माध्यमातून रखडलेले प्रश्न मार्गी लाऊ असे आश्वासन महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे अध्यक्ष अमर शेख यांनी दिले या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख. तर प्रमुख पाहुणे म्हणून मजलगाव येथील समाजसेविका संजीवनी राऊत, राष्ट्रवादी च्या नेत्या सौ.शितल धोंडरे. सुनीता नेटके. संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष शेख नसीर, उपध्यक्ष सय्यद आमेर हे होते या वेळी संयोजक शेख हमीद परमेश्वर साळुंके यांनी सर्वांचा स्वागत करून कार्यक्रम संपन्न केले.

## पंतप्रधान मोदींमुळे 'सुशासन' ही देशाची संस्कृती बनली : ना. मुंडे

### अमरावतीत भाजपचा 'संकल्प से सिध्दी' उपक्रम : ना. पंकजाताईंनी साधला कार्यकर्त्यांशी संवाद

अमरावती । प्रतिनिधी

देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा गेल्या अकरा वर्षांचा कार्यकाळ देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने लिहिला जाईल. भारताच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी याकाळात करण्यात आली असून सरकार म्हणजे सेवा या हेतूने काम केले जात आहे. मोदींमुळे सुशासन ही देशाची संस्कृती बनली आहे, असे सांगत त्यांच्या योजना सर्व सामान्यापर्यंत पोचवा असं आवाहन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारला अकरा वर्ष पुर्ण होत आहेत या पार्श्वभूमीवर संपुर्ण देशात भाजपातर्फे 'संकल्प से सिद्धी' हा उपक्रम राबविला जात आहे, याचाच एक भाग म्हणून ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरात कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित



करण्यात आला होता, त्यावेळी त्या बोलत होत्या.

मोदी सरकारच्या लोक कल्याण कारी कामाचा लेखाजोखा मांडताना पंकजाताई पुढे बोलतांना म्हणाल्या, पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली ज्या गोष्टी साध्य झाल्या त्यात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला तर विकासाला गती मिळते, भाजपा सरकार जेथे जेथे आहे तेथे तेथे गरिबांचा विकास झाला आहे, सरकार म्हणजे सेवा या हेतूने काम केले जाते या गोष्टींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. गेल्या ११ वर्षात भारताने अमृत काळात विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. भ्रष्टाचार मुक्त कारभार, सामान्य माणसाला योजनांचा थेट लाभ, आयुष्यमान भारत, पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था, जनधन योजना, ऑपरेशन सिंदूर अशी कितीतरी चांगली कामे झाली आहेत. यासाठी मोदी सरकारच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या विविध विकास योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम आपण सर्वांनी करावे असे ना. पंकजाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांना केले.

यावेळी शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, जिल्हाध्यक्ष प्रभुदास बिलावलेकर, रविराज देशमुख, प्रवक्ते शिवराज कुलकर्णी, जयंत डेहणकर, ललित समदूरकर, युवा मोर्चाचे बादल कुलकर्णी, कौशिक अग्रवाल, राजु कुरील, सुनील काळे, संजय नरवणे, कुसुमताई साहू, राधा कुरीळ यांच्यासह भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### अंबादेवी मंदिरात 'नो प्लास्टिक मोहीम'

ना. पंकजाताई मुंडे यांनी सकाळी शहरातील सुप्रसिद्ध श्री.अंबादेवी मंदिरात देवीचे मनोभावे दर्शन घेतले. तसेच, आई एकवीरा मातेचे देखील दर्शन घेऊन सप्त गोमाता प्रदक्षिणा मंदिरातील गोशाळेस भेट दिली. उपस्थित भाविक भक्तांना कापडी पिशव्यांचे वाटप करून एकल प्लॉस्टिक बंदीबाबत मार्गदर्शन केले. तत्पूर्वी, मंदिर ट्रस्ट च्या वतीने करण्यात आलेला स्नेहसत्कार स्विकारला.

## अभाविपच्या मागणीला यश!

### बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना अभाविप च्या प्रयत्नांनी विद्यावेतन लागू

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतरवासी (इंटर्नशिप) कालावधीदरम्यान विद्यावेतन मंजूर करण्यात आले आहे. हा निर्णय राज्यातील हजारो नर्सिंग विद्यार्थ्यांसाठी अत्यंत दिलासादायक ठरणार आहे. शासकीय बी.एस.सी. नर्सिंग अभ्यासक्रमांतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या इंटर्नशिप दरम्यान सकाळ, दुपार व रात्र अशा तीनही सत्रांमध्ये सेवा बजवावी लागते. आपत्कालीन परिस्थितीतही हे विद्यार्थी रुग्णसेवेचे कर्तव्य पार पाडतात परंतु या कालावधीत त्यांना कोणतेही मानधन किंवा विद्यावेतन मिळत नव्हते. या अन्यायकारक परिस्थितीच्या विरोधात अभाविपने आवाज उठवत प्रशासनाला अनेक वेळा निवेदन सादर करून बी.एस.सी. नर्सिंग विद्यार्थ्यांना दरमहा सात हजार रुपये विद्यावेतन देण्याची मागणी केली होती. राज्यातील गोरगरीब व शेतकरी कुटुंबांतील विद्यार्थी या कोर्समध्ये प्रवेश घेत असतात यामुळे विद्यार्थांना दिलासा मिळणार आहे.

शासनाने या निवेदनाची दखल घेत विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेतला असून अभाविपच्या या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. अभाविप या निर्णयाचे स्वागत करत असून या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या अनेक समस्यांचे निराकरण होणार असून त्यांचे मनोबल उंचावन्यास मदत होईल तसेच त्यांच्या शिक्षणाच्या वाटचालीत सकारात्मक बदल घडून येईल.

अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री कु.वैभवी ढिवरे म्हणाल्या की मागील अनेक दिवसांपासून बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन लागू व्हावे यासाठी अभाविप प्रयत्न करत होती. या प्रयत्नांना यश आले असून बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना या निर्णयामुळे दिलासा मिळणार आहे. अश्या अनेक समस्या विद्यार्थ्यांना येतात व त्या सोडवण्यासाठी अभाविप नेहमीच विद्यार्थ्यांसोबत असेल.

## रस्त्यांमुळे जनतेचा होणारा छळ थांबवा : शेख साहिल

बीड । प्रतिनिधी

प्रभाग क्रमांक वीस आणि एकवीस येथील अरीश कॉलोनी, सय्यद अली नगर, आरिफअली नगर, नमरा कॉलोनी, मोहामदिया कॉलोनी, हजरत बालेपिर शाळा परिसर या भागातील रस्त्यांच्या दुरवस्थेला नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेकदा आमदार, नगरपालिका प्रशासक यांच्या सह प्रशासनाला या बाबत कळवून देखील या भागातील रस्त्यांचा प्रश्न जैसे थेच आहे. अनेकदा नगरपालिका प्रशासनाला निवेदन आंदोलन करून देखील जाग येत नसल्याने या ठिकाणच्या रस्त्यांची मोठी दुरवस्था झाली आहे, या रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिकांचा मात्र मोठा छळ होत आहे.



प्रभाग क्रमांक वीस आणि एकवीस येथे अनेक मोठे आणि मुख्य रस्ते चिखल मय झाली आहेत. रस्त्यांवर मोठमोठे खड्डे निर्माण झाले असल्याने परिसरातील नागरिकांना पायी चालण्यास आणि वाहनाने प्रवास करण्यास अनेक संकटाना तोंड द्यावे लागत आहे. अनेकदा या चीखलामुळे आणि खड्ड्यांमुळे अपघात देखील घडत असतात. शाळकरी मुलांना वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांसह महिला भगिनींना या रस्त्यावरून रहदारीस मोठा त्रास सोसावा लागतो. बीडचे अनेक कर्ते नेते या प्रश्नाला जाणून आहेत आणि प्रशासनाला देखील याची कल्पना आम्ही वारंवार दिलेली आहे.

मात्र हे सर्व ज्ञात असून देखील गेंड्याची कातडी पांघरूण सोंग घेतल्या सारखा प्रकार सुरू आहे. या सर्व नागरिकांच्या वेदना तुम्हाला कधी कळणार गेल्या अनेक वर्षापासून या वेदना स्थानिक नागरिक सहन करीत आहेत मात्र कोणालाच याचे काही देणे घेणे नाही. आता या भागतील लाकाच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. या वेदना आता एखाद्या मोठ्या जण आंदोलनाची दिशा घेवू शकतात म्हणून या सर्व भागातील रस्त्यांचा मोठा आणि आवश्यक असा प्रश्न मार्गी लावावा आणि लोकांना यातून मुक्त करण्यात यावे या करिता जनतेने स्वातंत्र्य दिनी लोकशाही मार्गाने मोठे आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या आंदोलनास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असा इशारा समाजसेवक शेख साहिल सेठ यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

## पोलिस बांधवांच्या आरोग्य शिबिरात २४० जणांची आरोग्य तपासणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजाच्या रक्षणासाठी सदैव सेवेत तत्पर असणाऱ्या पोलिस बांधवांसाठी रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिरात पोलिस बांधव व त्यांच्या कुटुंबियांची तपासणी करण्यात आली. रविवारी सकाळी अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे,सचिव धनराज सोळंकी, इंडीयन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना मुरलीधर खोकले म्हणाले की, रोटरी व इंडियन मेडिकल असोसिएशन यांनी पोलिस बांधव व त्यांच्या कुटुंबियांना खऱ्या अर्थाने न्याय दिला. ताण, तणाव व कामाचा व्याप यामुळे पोलिसांच्या आरोग्यावर ताण येतो. यासाठी त्यांनी वर्षातून एकदा आरोग्य तपासणी केली पाहिजे, असे सांगून रोटरी क्लब ने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे कौतुक



केले. यावेळी पोलिस निरीक्षक शरद जोगदंड, रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.नवनाथ घुगे यांनी आपल्या प्रास्ताविकात या महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्या मागची भूमिका मांडली. पोलिसांनी या धावपळीच्या युगात कामाचा ताण न घेता आरोग्याची काळजी कशी घ्यावी याचा मौलिक सल्ला दिला.

कार्यक्रमाचे संचलन धनराज सोळंकी यांनी केले. यावेळी रोटरी क्लबचे अंगद कराड, मंजुषा जोशी, स्वप्नील परदेशी, संतोष मोहिते, आनंद कर्णावट, बाळासाहेब कदम, गोपाळ पारीख, प्रदीप झरकर, डॉ.अनिल केंद्रे, भीमसेन लोमटे, रुपेश रामावत, अजय पाठक, सचिन बेंबडे, बालाजी घाडगे, गणेश राऊत, भीमाशंकर शिंदे, रमेश देशमुख, संजय गौड, रुपेश चव्हाण, संजय देशमुख, जतिन कर्णावट आदी उपस्थित होते.

या महाआरोग्य शिबिरात डॉ.नवनाथ घुगे, डॉ.राहुल धाकडे, डॉ.अतुल शिंदे, डॉ.संजय शेटे, डॉ.अनिल मस्के, डॉ.अरुणा केंद्रे, डॉ.अनिल भुतडा, डॉ.मनिषा भुतडा, डॉ.स्नेहल होळंबे, डॉ.चेतन आदमाने, डॉ.सचिन पोतदार, डॉ.उद्धव शिंदे, डॉ.जबेर शेख, डॉ.विजय लाड, डॉ.निलेश तोष्णिवाल, डॉ.विनोद जोशी, डॉ.योगेश मुळे, डॉ.संदीप चव्हाण, डॉ.शाहिद शेख, डॉ.ऋषिकेश घुले, डॉ.प्रियंका आरबडवाड या डॉक्टरांनी तपासण्या व औषधोपचार केले. हृदयरोग, मधुमेह, छातीविकार व दमा, अस्थिरोग, बालरोग, नेत्र तपासणी, स्त्रीरोग, दंत चिकित्सा, त्वचारोग, यासह इसीजी, रक्ताच्या विविध प्रकारच्या तपासण्याही करण्यात आल्या.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT